आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

मंगळवार दिनांक 17/02/२०२६

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 63 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राज्यात सध्या राजकीय घडामोडींना वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP) च्या विलिनीकरणाच्या चर्चादरम्यान आता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी कामाला वेग दिला असून त्यांच्या नेतृत्वाभोवती पक्ष संघटनात्मक पातळीवर एकवटताना दिसत आहे.**



विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीची तारीख अखेर निश्चित झाली आहे. येत्या २६ फेब्रुवारी रोजी पक्षाच्या कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार असून याच बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षपदाची अधिकृत निवड जाहीर केली जाणार आहे. या पदासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे.

आज सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादीचे आमदार, खासदार आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत अध्यक्षपदाच्या निवडीबाबत सविस्तर चर्चा झाली. गेल्या काही दिवसांपासून अध्यक्षपदासाठी विविध नावांची चर्चा सुरू होती. विशेषतः प्रफुल पटेल यांचे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात होते. त्यातच केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी एका मुलाखतीत प्रफुल पटेल यांचा उल्लेख केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना अधिकच उधाण आले होते.

मात्र आता पक्षाच्या बैठकीनंतर परिस्थिती स्पष्ट होत असून, राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. त्यामुळे अध्यक्षपदावरून दोन्ही गटांतील पदाधिकारी, आमदार आणि खासदारांमध्ये सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम मिळण्याची चिन्हे आहेत. २६ फेब्रुवारीची बैठक केवळ औपचारिकता ठरेल का, की त्यात काही राजकीय कलाटणी पाहायला मिळेल, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

मात्र सध्याच्या घडामोडींवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नेतृत्वाची सूत्रे सुनेत्रा पवार यांच्या हाती अधिकृतपणे जाण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# नवीन प्रशासकीय इमारतीची पाहणी; भाऊसाहेब भोईर यांचा दर्जेदार कामांवर भर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येला आणि विस्ताराला अनुरूप अशी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या नवीन भव्य प्रशासकीय इमारतीची आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी सविस्तर पाहणी केली.**





या पाहणीदरम्यान त्यांनी इमारतीच्या विविध मजल्यांवरील सुरू असलेल्या बांधकामांची, संरचनात्मक कामांची तसेच अंतर्गत सुविधा उभारणीची माहिती अधिकाऱ्यांकडून घेतली. कामाचा दर्जा, वापरण्यात येणारे साहित्य, सुरक्षिततेची उपाययोजना आणि नियोजित वेळापत्रक याबाबत त्यांनी सखोल चर्चा केली.

शहराचा वेगाने वाढणारा विस्तार लक्षात घेता नागरिकांना विविध विभागांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी धावपळ करावी लागू नये, यासाठी सर्व नागरी सेवा एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात, हा या इमारतीमागील प्रमुख उद्देश असल्याचे भोईर यांनी सांगितले. अत्याधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल सेवा, सुसज्ज सभागृहे, प्रशस्त प्रतीक्षागृहे आणि दिव्यांगांसाठी सुलभ प्रवेश यांसारख्या सुविधा या इमारतीत असतील, अशी माहितीही त्यांनी दिली.

काम वेळेत पूर्ण व्हावे आणि गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. ठरलेल्या मुदतीत प्रकल्प पूर्ण करून नागरिकांच्या सेवेत लवकरात लवकर दाखल करण्याबाबत त्यांनी आग्रही भूमिका घेतली.

शहराच्या वैभवात भर

ही नवीन प्रशासकीय इमारत केवळ कार्यालयीन कामकाजापुरती मर्यादित नसून शहराच्या विकासाचे प्रतीक ठरेल, असा विश्वास भाऊसाहेब भोईर यांनी व्यक्त केला. आधुनिक रचना आणि सुविधा यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात निश्चितच भर पडेल, असे त्यांनी नमूद केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 17/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# प्रभाग क्र. 21 मधील पाणीपुरवठा सुरळीत करा - नगरसेवक डब्बू आसवानी

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी प्रभाग क्र. २१ मधील विविध परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून पाणीपुरवठ्याचा दाब अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.**



उंच भागात किंवा जलवाहिनीच्या शेवटच्या टोकावर असलेल्या घरांमध्ये पाणी पोहोचत नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक डब्बू आसवानी यांनी तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

**मुख्य अडचणी पुढीलप्रमाणे**

पाण्याचा दाब कमी असल्यामुळे उंचावरील घरांमध्ये पाणी चढत नाही.

अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

वारंवार तोंडी तक्रारी करूनही कायमस्वरूपी निवारण झालेले नाही.

या समस्येवर तांत्रिक उपाय म्हणून Pimpri Chinchwad Municipal Corporation च्या पाणीपुरवठा विभागामार्फत संबंधित ठिकाणी मोठ्या क्षमतेचा 'बुस्टर पंप' बसवण्यात यावा, जेणेकरून शेवटच्या घरांपर्यंतही पुरेशा दाबाने पाणी पोहोचेल, अशी मागणी करण्यात आली आहे.याबाबत पिंपरी-चिंचवड मनपाच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता ओंबासे यांच्याकडे निवेदन देऊन लवकरात लवकर काम सुरू करण्याची विनंती करण्यात आली आहे.

नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित असलेल्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमात जास्तीतजास्त नागरिकांनी सहभागी व्हा - महापौर रवि लांडगे

## पिंपरी चिंचवडमध्ये 'हिंद-दी-चादर' अनुषंगाने संतपीठासोबत विशेष बैठक

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी:श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'हिंद-दी-चादर' या भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत महापौर रवि लांडगे यांनी जगद्गुरु संत तुकाराम संतपीठासोबत विशेष बैठक घेतली. हिंद-दी-चादर या कार्यक्रमात शहरातील जास्तीतजास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी महापौर रवि लांडगे यांनी केले.**



महापालिकेचे उपायुक्त तथा संतपीठाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप खोत, शिक्षणाधिकारी तथा संतपीठाच्या सचिव संगीता बांगर, महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड, संतपीठाच्या संचालिका डॉ. स्वाती मुळे, संचालक हभप राजू महाराज ढोरे,संतपीठाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे, चिंतन समिती सदस्य ज्ञानेश्वर भांगरे, शिक्षक महेश शेळके, अविनाश भोगील, चंद्रकांत गोसावी, विलास कोकाटे, शिक्षिका मंगल अंबरे, अर्चना देसाई, सुचेता पुजारी, मुग्धा शिरोडकर, पूर्णिमा इंगळे आदी उपस्थित होते.यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, 'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान हे केवळ एका धर्मासाठी नसून संपूर्ण मानवतेच्या स्वातंत्र्य आणि श्रद्धेच्या रक्षणासाठी होते. 'हिंद-दी-चादर' हा कार्यक्रम त्यांच्या त्यागाची आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांची आठवण करून देणारा आहे. पिंपरी चिंचवड शहर हे विविधतेत एकतेचे प्रतीक आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश अधिक दृढ होईल. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे,' असे आवाहन देखील त्यांनी केले.या बैठकीत वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत या कार्यक्रमाचे ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्व पोहोचवण्यावर विशेष भर देण्यात आला.

कीर्तन, प्रवचन, जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर करून युवक, महिला मंडळे, सामाजिक संस्था आणि संघटनांना या उपक्रमात सहभागी करून घेण्याबाबत चर्चा झाली.

संत परंपरेतून दिलेला समतेचा आणि बंधुभावाचा संदेश 'हिंद-दी-चादर' या कार्यक्रमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 17/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पुणे पोलिसांची राजस्थानमध्ये मोठी धडक कारवाई

## 4.27 कोटींचा एमडी जप्त; अंमली पदार्थांची आंतरराज्यीय टोळी उध्वस्त, 6 आरोपी अटकेत

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**खराडी पोलीस स्टेशन, पुणे शहर यांच्या पथकाने अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत राजस्थानमध्ये सक्रिय असलेली आंतरराज्यीय एमडी (मेफेड्रॉन) तस्करी करणारी टोळी उध्वस्त केली आहे.**



या कारवाईत एकूण १ किलो ९६० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आला असून रोख रक्कम, वाहन, मोबाईल व इतर साहित्य असा एकूण ४ कोटी २७ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे.दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास खराडी परिसरातील ईऑन फेज-२ मागील गेटजवळ सार्वजनिक रस्त्यावर दोन इसम एका पांढ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून २७ ग्रॅम एमडी व तत्सम साहित्य बाळगताना आढळून आले. त्यांच्याकडून सुमारे १२ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी खराडी पोलीस स्टेशन येथे एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.तपासादरम्यान हे दोन्ही आरोपी मूळचे राजस्थान राज्यातील जोधपूर जिल्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले.ते मागील एक वर्षापासून राजस्थानमधील संपर्कातून पुणे परिसरात एमडीचा व्यवसाय करत असल्याची माहिती समोर आली. पोलिस कोठडीत कौशल्यपूर्ण तपास करत असताना एमडीचा पुरवठा करणाऱ्या मुख्य आरोपींची माहिती मिळाल्यानंतर तपासाची दिशा राजस्थानकडे वळवण्यात आली.दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी वाघोली परिसरात सापळा रचून एमडी पुरवठा करणाऱ्या आरोपीस ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १५१ ग्रॅम एमडी, मोबाईल फोन असा सुमारे ३० लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपासात आणखी आरोपींचा सहभाग उघडकीस आला. हडपसर, मुंढवा व मांजरी परिसरातून अनुक्रमे एमडी विक्री करणारे आरोपी पकडण्यात आले.

एका आरोपीकडून फॉर्च्युनर वाहनासह ३९८ ग्रॅम एमडी, मोबाईल फोन असा एक कोटी रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.पुढील तपासासाठी पाच विशेष पथके राजस्थान राज्यात रवाना करण्यात आली. तेथे आरोपींच्या घरांची झडती घेत मुख्य वितरकास अटक करण्यात आली.त्याच्याकडून तब्बल १ किलो ३८४ ग्रॅम एमडी, सुमारे २ कोटी ७६ लाख रुपयांचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. तसेच फरार आरोपीसही राजस्थानमधून ताब्यात घेण्यात यश आले.

या संपूर्ण कारवाईत अटक आरोपींकडून एकूण १ किलो ९६० ग्रॅम एमडी, सुमारे ३ कोटी ९२ लाख रुपयांचा अंमली पदार्थ, तसेच मोबाईल फोन, फॉर्च्युनर वाहन व रोख रक्कम असा मिळून एकूण ४ कोटी २७ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली खराडी पोलीस स्टेशन व अंमली पदार्थविरोधी पथकाच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आली असून सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. पुणे पोलिसांच्या या कारवाईमुळे अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठे यश मिळाल्याचे बोलले जात आहे

# कौटुंबिक वादातून महिलेवर मारहाण ; आंबेगावात गुन्हा दाखल, आरोपी फरार

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**आंबेगाव (देहूफाटा) परिसरात कौटुंबिक वादातून एका महिलेवर शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास सुमारस तापकीर गल्ली, गजानन महाराज मंदिर मागे, देहूफाटा, आंबेगाव येथे ही घटना घडली.फिर्यादीच्या तक्रारीनुसार, घरगुती कारणावरून वाद निर्माण होऊन आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या बहिणीला घराबाहेर ओढत नेऊन शिवीगाळ व हाताबुक्क्यांनी मारहाण केली.

तसेच कमरेच्या चामड्याच्या बेल्टने मारहाण करताना बेल्टची लोखंडी बकल फिर्यादीच्या डोक्याला लागून दुखापत झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.या प्रकरणी यंकटी मानिक मुंडे (वय ३०), नारायण धनराज घुगे (वय ४२), रंजना श्रीराम मुंडे (वय ४६), अर्चना वडजु दहिफळे (वय ४४) तसेच एका अनोळखी इसमाविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या सर्व आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून परिसरातील नागरिकांमध्ये या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 17/02/२०२6


पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भोसरी एमआयडीसीतील वीजखंडितीने उद्योग ठप्प; कोट्यवधींचे नुकसान

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**भोसरी एमआयडीसीच्या टी-ब्लॉक परिसरात आज सकाळपासून वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे हजारो उद्योगांचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे. ट्रान्सफॉर्मर बिघाडामुळे निर्माण झालेल्या या परिस्थितीचा उद्योगांवर गंभीर परिणाम झाला असून अनेक कंपन्यांना कामगारांना काम नसताना बसून पगार द्यावा लागत आहे. उत्पादन बंद पडल्याने उद्योगांना कोट्यवधी रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे.**



मार्च अखेर जवळ आल्याने उद्योगांमध्ये आधीच कामाचा प्रचंड ताण असताना ही वीजखंडिती म्हणजे दुहेरी संकट ठरले आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे वीजपुरवठा नेमका कधी सुरू होणार याबाबत कोणतीही ठोस माहिती देण्यात आलेली नाही, त्यामुळे उद्योगांचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे.या पार्श्वभूमीवर इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी Maharashtra State Electricity Distribution Company Limited (महावितरण) च्या कारभारावर कडाडून टीका केली आहे. उद्योजकांकडून विजबिलासाठी कोणतीही मुदत न देता त्वरित वीजपुरवठा खंडित केला जातो; मात्र हजारो कंपन्या दिवसभर बंद राहून प्रचंड नुकसान सहन करत असताना त्याची जबाबदारी घेण्यास महावितरण तयार नसल्याचा आरोप त्यांनी केला.

### अभय भोर यांच्या ठाम मागण्या

तात्काळ दुरुस्ती करून अखंड वीजपुरवठा सुरू करावा

बॅकअप व पर्यायी व्यवस्थेची कायमस्वरूपी योजना जाहीर करावी

आज झालेल्या नुकसानीची नुकसानभरपाई उद्योगांना द्यावी

देखभाल व आपत्कालीन प्रतिसादासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची निश्चिती करावी

उद्योग हा स्थानिक अर्थव्यवस्थेचा कणा असून, उच्च दराने वीजबिल भरूनही सातत्यपूर्ण वीजपुरवठा न मिळणे हे अत्यंत संतापजनक असल्याचे भोर यांनी नमूद केले. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून उद्योगांना दिलासा द्यावा; अन्यथा उद्योगांच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# चिंचवड येथील जिजाऊ उद्यानाची पाहणी

## नगरसेवक सुरेश भोईर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**चिंचवड गाव येथील जिजाऊ उद्यानाची नुकतीच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक सुरेश शिवाजी भोईर यांनी पाहणी केली. उद्यानातील विविध समस्या प्रत्यक्ष जाणून घेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.**



पाहणीदरम्यान उद्यानातील पदपथांची दुरवस्था आणि ओपन जिममधील तुटलेली उपकरणे लक्षात आली. यामुळे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत सुरेश भोईर यांनी मनपा अधिकाऱ्यांना दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्याचे निर्देश दिले.

तसेच जेष्ठ नागरिकांच्या मागणीनुसार उद्यानात बसण्याची सोय तसेच ऊन-पावसापासून संरक्षणासाठी गजिबो (आश्रय शेड) उभारण्याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

उद्यान हे नागरिकांच्या आरोग्य व विरंगुळ्यासाठी महत्त्वाचे ठिकाण असल्याने आवश्यक त्या सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 17/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ईव्हीएम हॅकच्या नावाखाली लाखो रुपये उकळले

## आमदार सुनील शेळके यांचा भाजपवर गंभीर आरोप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मावळ तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत १५ पैकी १५ जागांवर दणदणीत विजय मिळवल्यानंतर वडगाव मावळ येथे राष्ट्रवादी च्या वतीने कृतज्ञता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात बोलताना आमदार सुनील शेळके यांनी भाजपच्या स्थानिक नेत्यांवर नाव न घेता गंभीर आरोप करत राजकीय वातावरण चांगलेच तापवले.**



"ईव्हीएम मशीन हॅक करून विजय मिळवून देतो" असे आमिष दाखवत काही भाजप नेत्यांनी उमेदवारांकडून तब्बल २५ ते ३५ लाख रुपये उकळल्याचा खळबळजनक आरोप शेळके यांनी केला. या प्रकरणाची थेट मुख्यमंत्र्यांकडून चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी त्यांनी यावेळी केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे तालुक्यातील राजकारणात नव्या वादळाची चिन्हे दिसू लागली आहेत.

शेळके यांनी स्पष्ट शब्दांत आव्हान देत म्हटले, "कोणीही माझ्यामुळे मोठे झाले असे वाटत असेल, तर २०२९ मध्ये माझ्या विरोधात उभे राहा. जनता काय निर्णय देते ते पाहू." आपल्या कार्यपद्धतीवर आणि जनतेच्या विश्वासावर आपला पूर्ण भर असल्याचे त्यांनी यावेळी ठामपणे अधोरेखित केले.

नवनिर्वाचित सदस्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी जनतेच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा आणि वैयक्तिक कार्यक्रमांपेक्षा सार्वजनिक कामांना प्राधान्य देण्याचा संदेश दिला. दर आठवड्याला होणाऱ्या जनता दरबारात उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचे सांगत, "पक्षाचे काम हे घरचे काम नसून जनतेची जबाबदारी आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

येणाऱ्या २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत मावळचा आमदार दीड लाख मताधिक्याने विजयी होईल आणि तो राष्ट्रवादी काँग्रेसचाच असेल, असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या मेळाव्यास माजी मंत्री मदन बाफना, माजी अध्यक्ष बबनराव भेगडे, जिल्हाध्यक्ष विठ्ठल शिंदे, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. विशेष म्हणजे महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षवेधी ठरला.

निवडणुकीतील भव्य यशानंतरही जल्लोष टाळून कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या सभेमुळे मावळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

# शिक्षणाचा उपयोग समाजपरिवर्तनासाठी व्हावा - नगरसेविका योगिता बारणे

## इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरातील थेरगाव परिसरातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. शाळेच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका योगिता महेश बारणे उपस्थित होत्या.**



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, मनोगते आणि आठवणींनी भरलेले अनुभव कथन सादर करत उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणले. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हा क्षण शालेय जीवनातील एक महत्वाचा टप्पा ठरला.

प्रमुख पाहुण्या योगिता बारणे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना आगामी शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा देत सांगितले की, "दहावीची परीक्षा ही आयुष्याचा शेवट नसून नव्या संधींची सुरुवात आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, चिकाटी आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या जोरावर आपले करिअर घडवावे." त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ स्वतःच्या यशापुरते मर्यादित न राहता समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांसाठीही कार्य करण्याचे आवाहन केले. शिक्षणाचा उपयोग समाजपरिवर्तनासाठी व्हावा, हीच खरी विद्यार्थ्यांची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब राठोड यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला व यंदाच्या निकालाबाबत सकारात्मक अपेक्षा व्यक्त केली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शाळेच्या आठवणींना उजाळा दिला.

शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या उपस्थितीत हा निरोप समारंभ संस्मरणीय ठरला. उत्साह, प्रेरणा आणि भावनिक क्षणांनी भरलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील नव्या पर्वाची प्रेरणादायी सुरुवात ठरला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968